| | |
|---|---|
| **MHKO070015252022** | **रे.क.नं.२४७/२०२२ मधील**<br>**नि.२४ वरील  आदेश**<br>**माँ पद्मावती फॅब्रीक्स प्रा.लि. कंपनी तर्फे संचालक दिनेशकुमार भागचंद कासलीवाल**<br>**वि.**<br>**दयाल यार्न तर्फे प्रोप्रा.दिनेश ओमप्रकाश चांडक** |

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरूध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करणेकरीता दिलेला आहे. प्रस्तुत अर्जावरच वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

३. प्रस्तुतचा दावा वादी यांनी रक्कम वसुलीकरीता  दाखल केलेला आहे. त्यानुसार वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. परंतु प्रतिवादी यांनी वादी यांचा उलटतपास न घेतल्यामुळे त्यांच्याविरुध्द दि.३०.०१.२०२६ रोजी उलटतपास नाहीचा आदेश पारीत झालेला आहे.

४. प्रतिवादी यांच्या अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये प्रतिवादी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण नमुद केलेले नाही. परंतु सदरचा दावा हा रक्कम वसुलीकरीता असल्यामुळे उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याच्या उद्देशाने प्रतिवादी यांना संधी देणे विधीसंगत वाटते. प्रतिवादी यांना संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळेच्या अनुषंगाने वादीला खर्च देणे देखील गरजेचे आहे. सदर विलंबाची भरपाई प्रतिवादी यांचेवर योग्य तो खर्च

आकारुन करणे न्यायोचित होईल. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**– <u>आदेश</u> –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.२४) रक्कम रु.२००/– (रक्कम रु.दोनशे मात्र) च्या खर्चावरती मंजूर करण्यात येतो.

२. सदरची रक्कम प्रतिवादी यांनी वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला विना म्हणणेचा आदेश रद्दबातल समजणेत यावा.

PATIL MAYUR SAMPAT

Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2026.04.24 13:20:01 +0530

दि.२४/०४/२०२६

**(एम. एस. पाटील )**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर